# प्रेस नोट

# सामाजीक बांधीलकी व जातीय सलोखा कायम ठेवुन गणोशोत्सव साजरा करु या

जा.क्र.५९९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २५/०८/२०१७

श्रीमती विनीता साहु, जिल्हा पोलीस अधीक्षक भंडारा यांनी दिनांक २५/०८/२०१७ पासुन साजरा केल्या जाणाऱ्या श्रीगणेश उत्सव संबधाने हार्दीक शुभेच्छा देवून, प्रदुषण मुक्त, शांतता व सुव्यवस्थेत, भयमुक्त वातावरणात उत्सव साजरा करण्याचे कळकळीत आवाहन केले आहे. सार्वजनीक मंडळानी याकरीता काही महत्वाच्या मार्गदर्शनपर सुचना वजा विनंती केली आहे.

१) इको फ्रेडंली श्री गणेशाची संकल्पना राबवावी pop चा वापर टाळावा.

२) सदर उत्सव हा डि. जे. मुक्त परंतु पारंपारीक वाद्यांचा वापर करुन साजरा करावा.

३) फटाक्याचा वापर टाळावा त्यामुळे प्रदुषण टाळण्यास मदत होईल. ध्वनी प्रदुषण व हवा दुषीत होणार नाही.

सदरचा गणेशोत्सव शांतता व सुव्यवस्थेत सर्व धर्मातील नागरीकामध्ये जातीय सलोख्याची भावना अबाधीत राहुन, धार्मीक भेदभाव न बाळगता साजरा होण्यासाठी पोलीस प्रशासनाच्या वतीने उपाययोजना करण्यात आल्या असुन दंगा काबु योजनेची रंगीत तालीम सर्व पोलीस स्टेशन स्तरावर राबविण्यात आलेली आहे. त्याचाच एक भाग म्हणुन रोड मार्च, अवैध मद्य व पंशुच्या वाहतुकीवर प्रतिबंध घालण्यासाठी १३ ठिकाणी तपासणी नाके लावण्यात आलेले आहेत.

जिल्हयातील पोलीस बंदोबस्ताकरीता ०५ पोलीस उपअधीक्षक, १५ पोलीस निरीक्षक, ३२ सहा. पोलीस निरीक्षक, ४३ पोलीस उपनिरीक्षक १०५६ पोलीस कर्मचारी, ५७२ होमगार्ड व राज्य राखीव पोलीस दलाचे २ प्लाटुन नेमण्यात आले आहेत.

यावर्षी भंडारा जिल्हयात '' एक गाव एक गणपती '' या संकल्पने नुसार २७२ मुर्तीची स्थापना केली जाणार असून, २७१ सार्वजनीक गणेशमुर्ती असे एकुण ५४३ श्रीगणेश मुर्तीची स्थापना होणार आहे.

पोनी. एम. एम. सिडाम
जिवीशा शाखा भंडारा
दुरध्वनी.क्र ८६९८७३९१९६

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.